महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.

दुरध्वनी क्रमांक : ०२२ - २४०७७४४१
फॅक्स क्रमांक : ०२२ - २४०२५७६३

क्र.मासं/रवका/न.क्र.२८३/
**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.**
एक्स्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
तळ मजला, प्लॉट नं.१,धारावी रोड,माटुंगा,
मुंबई - ४०० ०१९.
email : cgmp@mahadiscom.in
website : www.mahadiscom.in

## प्रशासकीय परिपत्रक क्र. ४५८ दि. १४ / ०५ / २०१३

विषय : कार्यकारी संचालक या पदाकरिता सा.आ.क्र.७४ (क) अनुसार उच्च वेतनश्रेणीचे लाभ विहित करण्याबाबत.

.....

सा.आ.क्र.७४ (क) दिनांक ३०.०४.१९७४ मधील तरतुदींनुसार आणि प्रशासकीय परिपत्रक क्र.३०४ दि.२८.०७.२०१० अन्वये कंपनीत विविध पदावर कार्यरत अधिकारी/कर्मचाऱ्यांना त्यांच्या सेवा कालावधीत उच्च वेतन श्रेणीचे प्रथम, द्वितीय व तृतीय लाभ देण्याबाबतच्या तरतुदी करण्यात आल्या आहेत. तसेच प्रशासकीय परिपत्रक क्र.३२० दि.२२.११.२०१० अन्वये ज्यांना पदोन्नतीचा मार्ग उपलब्ध नाही अशा अधिकारी/कर्मचारी यांना उच्च वेतनश्रेणीचे लाभ देण्याबाबतच्या वेतनश्रेण्याही विहित करण्यात आलेल्या आहेत.

२. या संदर्भात कार्यकारी संचालक या पदावर कार्यरत अधिकारी यांना सा.आ.क्र.७४ (क) दि.३०.०४.१९७४ मधील तरतुदींच्या अधीन राहून सदरचा लाभ मंजूर करण्याबाबतची बाब विचाराधीन होती. आता, व्यवस्थापकीय संचालक यांनी संचालक (वित्त), संचालक (संचलन) आणि संचालक (प्रकल्प) यांचेशी विचारविनिमय करुन कार्यकारी संचालक या पदाकरिता उच्च वेतनश्रेणीचे लाभ देण्याबाबतच्या वेतनश्रेण्या विहित करण्याकरिता मंजूरी प्रदान केली आहे.

३. या अनुषंगाने कार्यकारी संचालक या पदावर कार्यरत अधिकारी यांना पदोन्नतीचा मार्ग उपलब्ध नसल्यामुळे तसेच कार्यकारी संचालक या पदाची वेतनश्रेणी ही कंपनीमध्ये उच्चतम असल्यामुळे सा.आ.क्र.७४ (क) दि.३०.०४.१९७४ मधील तरतुदीनुसार उच्च वेतनश्रेणीचा प्रथम लाभ कार्यकारी संचालक या पदी कार्यरत अधिकारी यांना या पदावर रुजू झालेल्या तारखेपासून ६ वर्षानंतर, द्वितीय लाभ हा प्रथम लाभ मिळालेल्या तारखेपासून ६ वर्षानंतर आणि प्रशासकीय परिपत्रक क्र.३०४ दि.२८.०६.२०१० मध्ये विहित करण्यात आलेल्या अटी व शर्तींच्या अधीन राहून तृतीय लाभ तदर्थ म.रा.वि.मंडळ व मंडळाच्या विभाजनानंतर महावितरण कंपनीमध्ये अखंडित २८ वर्षे पूर्ण झाल्यानंतर मंजूर करण्यात येऊन सदरचे लाभ देय असलेल्या तारखेस (Due date) एक अतिरीक्त वेतनवाढ मंजूर करण्यात यावी.

४. सा.आ.क्र.७४ (क) दि.३०.०४.१९७४ व प्रशासकीय परिपत्रक क्र.३०४, दिनांक २८.०७.२०१० मधील इतर तरतूदी अबाधित राहतील.

५. सदर प्रशासकीय परिपत्रक कंपनीच्या इंट्रानेटवर उपलब्ध करण्यात आले आहे.

*( संदेश ए. हाके )*
*मुख्य महाव्यवस्थापक (मासं)*

*D:\O&M\Adm.Cir.F.N.-283-Grant of G.O.74.- E.D..doc*